MHPU180008292014

नियमित दिवाणी दावा/१२७/२०१४
**हनुमंत भगवान होले वि.. भिवा शिवराम चोरमले**

## निशाणी क्रमांक १५१ वरील आदेश
(पारीत दिनांक २०/०६/२०२६)

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.३ सखुबाई उर्फ कामाबाई सिदु शिंगटे यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला ८९६ दिवसांचा विलंब माफ होवुन मिळण्याकामी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत नोंदवली.

०२. वादी यांच्या कथनाप्रमाणे दाव्यातील प्रतिवादी क्र.३ सखुबाई उर्फ कामाबाई सिदु शिंगटे यांचे दिनांक ०५/१२/२०२२ रोजी निधन झाले आहे. त्यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे परंतु, वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर झाला असुन सदर विलंब हेतुपुरस्सर नाही, त्यामुळे विलंब माफ करुन अर्ज दाखल करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली. प्रतिवादीने या अर्जाला विरोध केला आणि अर्ज फेटाळावा अशी विनंती केली. तसेच, पर्यायी युक्तिवाद मांडून अर्जदारावर खर्च लादण्याची मागणी केली.

०३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व अभिलेखाची पाहणी केली. दाव्यातील प्रतिवादी क्र.३ सखुबाई उर्फ कामाबाई सिदु शिंगटे यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्र.१२८ सोबत दाखल केला असून त्यावरुन त्यांचे निधन दिनांक ०५/१२/२०२२ रोजी झाल्याचे सिध्द होते. निश्चीतच सदरचा अर्ज दाखल करण्यास अंदाजे २९ महिन्यांचा विलंब झाला आहे परंतु, न्यायाच्या प्रचलित तत्वानुसार दावा गुणदोषावर न्यायनिर्णीत होणे न्यायोचित ठरते. विलंब हा खर्चाची रक्कम देऊन माफ करता येऊ शकतो. त्यामुळे न्यायास अनुसरुन खर्चासह अर्ज मंजूर होणे न्यायोचित ठरते. त्यावरुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

वादीचा नि.क्र. १५१ चा अर्ज कॉस्ट रक्कम १,५००/- (रुपये एक हजार पाचशे मात्र) सह मंजुर करण्यात येते. कॉस्टची रक्कम प्रतिवादी यांना वादीने पुढील तारखेस किंवा त्यापूर्वी अदा करावी. रक्कम अदा झाल्यानंतर प्रतिवादी क्र.३ सखुबाई उर्फ कामाबाई सिदु शिंगटे यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

Digitally signed by AARISH SAIFODDIN SHAIKH
Date: 2026.06.20 16:55:58 +0530

दिनांक- २०/०६/२०२६.

**(ए. एस. शेख)**
४ थे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, दौंड, जि. पुणे.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | Deepak A. Merukar, Grade-3 |
| Court / Panel | :- | A. S. Shaikh<br>4th Jt. C.J.J.D. & Judicial Magistrate First Class (Court No. 4) Daund. |
| Order / Judgment date | :- | 20/06/2026. |
| Order / Judgment singed by the Presiding Officer on | :- | 20/06/2026. |
| Order/ Judgment uploaded on | :- | 20/06/2026. |